“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार”

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, संचलित

# Arts and Commerce College, Kadepur

## Department of Physical Education & Sports



## News Paper Clipping

### *Yoga Day – 2021-22*

दैनिक मुक्तागिरी

# कडेपूरच्या आर्टस् अँड कॉमर्स कॉलेजमध्ये योगदिन

**कडेगांव :** आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, कडेपूर येथे आठवा आंतरराष्ट्रीय योगदिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. आठव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे नियोजन महाविदयालयाच्या क्रीडाविभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने करण्यात आले. यावेळी शारिरीक शिक्षण संचालक प्रा. सौ. अनिता व्हटकर यांनी योगाचे महत्व सांगून योगाची प्रात्यक्षिके करून दाखविले तर प्रा.सौ. आशा सावंत यांनी प्राणायमाचे महत्व सांगून प्राणायमाचे प्रात्यक्षिके करून दाखविले.

यावेळी प्राणायमाचे महत्व सांगताना प्रा. सौ. आशा सावंत म्हणाल्या कि, ज्याप्रमाणे दररोज शरिराला अन्नाची गरज आहे, त्याचप्रमाणे शरीराला प्राणायम व



व्यायामाची गरज आहे. नियमित प्राणायम केल्याने ऊर्जा व उत्साह वाढतो.

तर यावेळी योगाचे महत्त्व सांगताना शारिरीक शिक्षण संचालिका प्रा. अनिता व्हटकर म्हणाल्या की, योगामुळे शरिर व मन यांच्यात एकरूपता निर्माण होऊन आत्मिक समाधान मिळते. जीवनात शाश्वत आनंद मिळवायचा असेल तर योगा हाच एकमेव मार्ग आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीत अनेक साधुसंतानी योग विद्येचा प्रचार आणि प्रसार केला असून प्रत्येक व्यक्तिती समाधानी आणि निरोगी जीवनासाठी सकाळी किंवा संध्याकाळी एक तास योगा आणि प्राणायमासाठी दिला पाहिजे, असेही त्या शेवटी म्हणाल्या. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डी. ए. पवार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र महानवर यांनी तर शेवटी आभारप्रदर्शन प्रा. अभिजित दळवी यांनी केले केले.

Jun 22, 2022 Page No. 3

emuktagiri.in

powered by thoughtpad infotech

“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार”

— शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, संचलित



# Arts and Commerce College, Kadepur

## Department of Physical Education & Sports

### *Yoga Day – 2021-22*

संमिश्र | दै. जनप्रवास | बुधवार, दि. २२ जून २०२२ | Website : janpravas.in | ४

# कडेपूर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

**कडेपूर :** येथील आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज येथे आठवा आंतरराष्ट्रीय योगदिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. आठव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे नियोजन महाविदयालयाच्या क्रीडाविभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने करण्यात आले. यावेळी शारिरीक शिक्षण संचालक प्रा. सौ. अनिता व्हटकर यांनी योगाचे महत्व सांगून योगाची प्रात्यक्षिके करून दाखविले तर प्रा. सौ. आशा सावंत यांनी प्राणायमाचे महत्व सांगून प्राणायमाचे प्रात्यक्षिके करून दाखविले.

यावेळी प्राणायमाचे महत्व सांगताना प्रा. सौ. आशा सावंत म्हणाल्या कि, ज्याप्रमाणे दररोज शरिराला अन्नाची गरज आहे, त्याचप्रमाणे शरीराला प्राणायम व व्यायामाची गरज आहे. नियमित प्राणायम केल्याने ऊर्जा व उत्साह वाढतो. तर योगाचे महत्त्व सांगताना शारिरीक शिक्षण संचालिका प्रा. अनिता व्हटकर म्हणाल्या की, योगामुळे शरिर व मन यांच्यात एकरूपता निर्माण होऊन आत्मिक समाधान मिळते. जीवनात शाश्वत आनंद मिळवायचा असेल तर योगा हाच एकमेव मार्ग आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीत अनेक साधुसंतानी योग विद्येचा प्रचार आणि प्रसार केला असून प्रत्येक व्यक्तिती समाधानी आणि निरोगी जीवनासाठी सकाळी किंवा संध्याकाळी एक तास योगा आणि प्राणायमासाठी दिला पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.



आठव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगाचे प्रात्यक्षिके करताना प्राध्यापक, विद्यार्थी.

यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डी. ए. पवार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र महानवर यांनी केले. प्रा. अभिजित दळवी यांनी आभार मानले.

### *Annual Prize Distribution – 2021-22*

शनिवार दि. ११ जून २०२२ | दै. प्रीतिसंगम

# समाजाची ढासळती मूल्यव्यवस्था महापुरुषांचे विचारच थांबू शकतील: महेश गायकवाड

**कडेगांव/प्रतिनिधी**

समाजात दुभंगलेपणा वाढत असून मूल्यांची पडझड होत आहे. माणूस माणसापासून दूर जात असून स्वार्थी आणि लोभाची भावना वाढीस लागली आहे. समाजाची ही ढासळती मूल्यव्यवस्था थांबवायची असेल तर थोर महापुरुषांनी सांगितलेली मुल्ये आणि विचार आचरणात आणण्याची गरज आहे, असे प्रतिपादन श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य प्राचार्य डॉ. महेश गायकवाड यांनी केले.

ते आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज कडेपूर येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभा प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तासगाव येथील सुप्रसिद्ध कथाकथनकार प्रा. आर. बी. पाटील हे होते. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य बापूराव पवार यांनी प्रास्ताविक करून महाविद्यालय राबवत असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेऊन उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी जिमखाना विभागप्रमुख प्रा.अनिता हटकर व सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. शीला इंगवले उपस्थित होत्या.



आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, कडेपूर येथे वार्षिक पारितोषिक वितरण करताना प्रमुख मान्यवर..

सामाजिक जिव्हाळा आणि माणसातील मानवता जिवंत ठेवायची असेल तर समाज सेवकांचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे, असे सांगून प्राचार्य महेश गायकवाड पुढे म्हणाले की, महापुरुषांचे विचार म्हणजे युवकांची व्यक्तिमत्व घडवणारे मौलिक धन आहे. आणि हे विचारांचे मौलिक धन तुम्हाला पुस्तकांमध्ये, महापुरुषांच्या चरित्रामध्ये सापडेल, असे सांगून त्यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, दलाई लामा, संत गाडगेबाबा, महात्मा फुले, महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील, संत तुकाराम, ज्ञानेश्वर आदी महापुरुषांच्या छोट्या-छोट्या कथा सांगून त्यांच्या विचारांचे भांडार उलगडून दाखविले.

यावेळी प्रा. आर. बी. पाटील यांनी मंगलिचं लग्न ही विनोदी कथा सादर करून कार्यक्रमात रंगत भरली. त्यांनी विनोदाच्या माध्यमातून माणसांच्या दुप्पटीपणावर बोट ठेवून कथेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.

प्रारंभी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन करून संस्थेच्या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पाहुण्यांची ओळख प्रा. सदाशिव बनकर यांनी करून दिली. यावेळी वर्षभर विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी जिमखाना अहवाल वाचन प्रा. अनिता हटकर यांनी तर सांस्कृतिक विभागाचा अहवालवाचन प्रा. शीला इंगवले यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजया पवार व प्रा. सुरज झूेपाटिल यांनी तर शेवटी आभार प्रदर्शन प्रा. दत्तात्रय होनमाने यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य बापूराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. राजेंद्र महानवर, प्रा. सुरज झूेपाटील, श्री. किरण भोंगाळे, श्री. सचिन माने यांनी परिश्रम घेतले.

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
— शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, संचलित



# Arts and Commerce College, Kadepur

# Department of Physical Education & Sports

## Annual Prize Distribution – 2021-22

### समाजाची ढासळती मूल्यव्यवस्था महापुरुषांचे विचारच थांबवू शकतील : प्राचार्य गायकवाड

जनप्रवास । प्रतिनिधी

**कडेपूर :** समाजात दुभंगलेपणा वाढत असून मूल्यांची पडझड होत आहे. माणूस माणसापासून दूर जात असून स्वार्थी आणि लोभाची भावना वाढीस लागली आहे. समाजाची ही ढासळती मूल्यव्यवस्था थांबवायची असेल तर थोर महापुरुषांनी सांगितलेली मुल्ये आणि विचार आचरणात आणण्याची गरज आहे, असे प्रतिपादन श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य प्राचार्य डॉ. महेश गायकवाड यांनी केले.

ते आर्टस अँड कॉमर्स कॉलेज कडेपूर येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभा प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तासगाव येथील सुप्रसिद्ध कथाकथनकार प्रा. आर. बी. पाटील हे होते. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य बापूराव पवार यांनी प्रास्ताविक करून महाविद्यालय राबवत असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेऊन उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी जिमखाना विभागप्रमुख प्रा.अनिता हटकर व सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. शीला इंगवले उपस्थित होत्या.



आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, कडेपूर येथे वार्षिक पारितोषिक वितरण करताना प्रमुख मान्यवर.

सामाजिक जिव्हाळा आणि माणसातील मानवता जिवंत ठेवायची असेल तर समाज सेवकांचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे, असे सांगून प्राचार्य महेश गायकवाड पुढे म्हणाले की, महापुरुषांचे विचार म्हणजे युवकांची व्यक्तिमत्व घडवणारे मौलिक धन आहे. आणि हे विचारांचे मौलिक धन तुम्हाला पुस्तकांमध्ये, महापुरुषांच्या चरित्रामध्ये सापडेल, असे सांगून त्यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, दलाई लामा, संत गाडगेबाबा, महात्मा फुले, महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील, संत तुकाराम, ज्ञानेश्वर आदी महापुरुषांच्या छोट्या-छोट्या कथा सांगून त्यांच्या विचारांचे भांडार उलगडून दाखविले.

यावेळी प्रा. आर. बी. पाटील यांनी मंगलिचं लग्न ही विनोदी कथा सादर करून कार्यक्रमात रंगत भरली. त्यांनी विनोदाच्या माध्यमातून माणसांच्या दुप्पटीपणावर बोट ठेवून कथेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.

प्रारंभी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन करून संस्थेच्या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पाहुण्यांची ओळख प्रा. सदाशिव बनकर यांनी करून दिली. यावेळी वर्षभर विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी जिमखाना अहवाल वाचन प्रा. अनिता हटकर यांनी तर सांस्कृतिक विभागाचा अहवालवाचन प्रा. शीला इंगवले यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजया पवार व प्रा. सुरज डुरेपाटिल यांनी तर शेवटी आभार प्रदर्शन प्रा. दत्तात्रय होनमाने यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य बापूराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. राजेंद्र महानवर, प्रा. सुरज डूरेपाटील, किरण भोंगाळे, सचिन माने यांनी परिश्रम घेतले.

**दै. जनप्रवास..... दि. 11-6-2022**

## Guest Lecture – 2021-22

**दै. ललकार..... दि. 4-5-2022**

### आत्मशांती व निर्मल आयुष्यासाठी योगा व प्राणायाम महत्त्वाचा

**प्रा. आशा सावंत**

कडेगांव दि. ३ – योगामुळे मन व शरीर निरोगी बनते. तंत्रज्ञान युगात मानवाचे जीवन ताणतणावाचे बनले आहे. आत्मशांती व निर्मल आयुष्यासाठी योगा व प्राणायाम महत्त्वाचा आहे असे प्रतिपादन योगगुरू प्रा. आशा सावंत यांनी केले.

ते आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज कडेपूर येथे आझादी का अमृत महोत्सवांतर्गत–आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आरोग्यदायी जीवनासाठी प्राणायामाचे महत्व या विषयावर बोलत होत्या. कार्यक्रमाच्या




अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. बापूराव पवार हे होते.

यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डी. ए. पवार उपस्थित होते. प्रारंभी शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. अनिता व्हटकर यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाचा उद्देश सांगितला.

प्राणायमामुळे शरीराचे शुद्धीकरण होते. श्वास हा मानवी शरीरासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक असून श्वासामुळे शरीराला ऊर्जा मिळण्यास मदत होते असे सांगून त्या पुढे म्हणाल्या की, आपल्या श्वासाचे कार्य व्यवस्थित असेल तर सगळे आजार दूर पळतात. मन संतुलित करून निर्मळ आयुष्यासाठी योगा व प्राणायाम महत्त्वाचे आहेत असेही त्या शेवटी म्हणाल्या.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य मा. बापूराव पवार म्हणाले की, योगा व प्राणायाम हे भारतीय संस्कृतीचे अविभाज्य घटक आहे असे सांगून त्यांनी योगाचे व प्राणायमाचे फायदे सांगितले. यावेळी योगगुरू प्रा. आशा सावंत यांनी प्राणायमाचे प्रात्यक्षिक करून दाखविले. प्रारंभी शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. अनिता व्हटकर यांनी सर्वांचे स्वागत स्वागत करुन प्रास्ताविक केले. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डी. ए. पवार यांनी मनोगत व्यक्त करून सर्वांचे आभार मानले.

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
— शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे


श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, संचलित

# Arts and Commerce College, Kadepur

# Department of Physical Education & Sports



## Under Lead College One Day Workshop – 2021-22



# खेळामध्ये करियर करायचे असेल तर विद्यार्थ्यांनी सकारात्मक मानसिकता ठेवली पाहिजे : कौस्तुभ गावडे

माणदेश एक्सप्रेस न्युज

कडेगाव : यश, अपयश व संघर्ष हे जीवनाचे घटक आहेत. अपयशाने कधीच खचून न जाता अपयशानंतर नेहमी प्रयत्नशील असले पाहिजे. खेळ हा घटक आयुष्य जगायला व अपयश पचवायला शिकवतो. खेळामध्ये करिअर करायचे असेल तर विद्यार्थ्यांनी मानसिकता सकारात्मक ठेवली पाहिजे असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी केले. ते आर्ट्स एंड कॉमर्स कॉलेज, कडेपूर व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अग्रणी महाविद्यालय अंतर्गत, क्रीडा कार्यमनावर परिणाम करणारे मानसशास्त्रीय घटक या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य बापूराव पवार हे होते. यावेळी साधन व्यक्ती म्हणून

कडेपूर : येथे क्रीडा कार्यमनावर परिणाम करणारे मानसशास्त्रीय घटक या विषयावर बोलताना कौस्तुभ गावडे

संचालिका प्रा.अनिता व्हटकर यांनी आपल्या प्रास्ताविकात अग्रणी महाविद्यालय अंतर्गत कार्यशाळा आयोजित करण्यामागील उद्देश सांगितला. आयुष्यामध्ये नेहमी प्रयत्नशील असले पाहिजे. अपयशाने खचून न जाता प्रयत्नशील करो राहांवे हे आपण

मानसिकता सकारात्मक ठेवली पाहिजे. खेळामध्ये करीयर करायचे असेल तर त्यासाठी पुर्ण वेळ दिला पाहिजे. विद्यार्थ्यांना खेळासाठी जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत. नोकरी मिळविण्यासाठी म्हणून खेळ न खेळता गोल्ड मेडल मिळवण्यासाठी खेळ खेळा असेही ते शेवटी म्हणाले.

मानसिकतेवर म्हणावे तितके संशोधन झाले नाही. खेळाडूंची आर्थिक परिस्थिती, फिटनेस व अन्य घटकांचा विचार करतो मात्र खेळाडूंच्या मानसिकतेचा म्हणावा तितका विचार करीत नाही. क्रीडा क्षेत्रात करियर करीत असताना मानसिक घटक अतिशय महत्त्वाचा आहे म्हणून खेळाडूंच्या मानसिकतेवर भर दिला पाहिजे असेही ते शेवटी म्हणाले. प्रारंभी मान्यवरांचे स्वागत प्राचार्य बापूराव पवार यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यशाळेस अग्रणी महाविद्यालय अंतर्गत कस्टलर झोन मधील पाच महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.विजया पवार यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.आशा सावंत यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारिरीक शिक्षण संचालिका प्रा.अनिता व्हटकर यांनी केले. ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी प्रा. सुरेश इरे-

## Under Lead College One Day Workshop – 2021-22



बुधवार २० एप्रिल २०२२ — दैनिक बंधुता

# यश, अपयश व संघर्ष हे जीवनाचे घटक-मुख्य कार्यकारी अधिकारी मा. कौस्तुभ गावडे

कडेगांव (बंधुता वृत्तसेवा): यश, अपयश व संघर्ष हे जीवनाचे घटक आहेत. अपयशाने कधीच खचून न जाता अपयशानंतर नेहमी प्रयत्नशील असले पाहिजे. खेळ हा घटक आयुष्य जगायला व अपयश पचवायला शिकवतो. खेळामुळेच आपल्यामध्ये आव्हान स्वीकारण्याची मानसिकता तयार होते, असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. कौस्तुभ गावडे यांनी केले.

ते आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, कडेपूर व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अग्रणी महाविद्यालय अंतर्गत - क्रीडा कार्यमनावर परिणाम करणारे मानसशास्त्रीय घटक या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. बापूराव पवार हे होते.

यावेळी साधन व्यक्ती म्हणून प्रा. मनिषा शिंदे व प्रा. डॉ. महेंद्र भोसले, तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डी.ए. पवार उपस्थित होते. प्रारंभी शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. अनिता व्हटकर यांनी आपल्या प्रास्ताविकात अग्रणी महाविद्यालय अंतर्गत कार्यशाळा आयोजित करण्यामागील उद्देश सांगितला.

आयुष्यामध्ये नेहमी प्रयत्नशील असले पाहिजे. अपयशाने खचून न जाता प्रयत्नशील कसे राहावे हे आपण खेळाडूकडून शिकले पाहिजे, असे सांगून मा.कौस्तुभ गावडे पुढे म्हणाले की, खेळांमध्ये करिअर करायचे असेल तर पहिल्यांदा विद्यार्थ्यांनी आपली मानसिकता सकारात्मक ठेवली पाहिजे. खेळामध्ये करीयर करायचे असेल तर त्यासाठी पुर्ण वेळ दिला पाहिजे. विद्यार्थ्यांना खेळासाठी जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत. नोकरी मिळविण्यासाठी म्हणून खेळ न खेळता गोल्ड मेडल मिळवण्यासाठी खेळ खेळा असेही ते शेवटी म्हणाले.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य मा. बापूराव पवार म्हणाले की, आजपर्यंत खेळामध्ये अनेक प्रकारचे संशोधन केले गेले. पण खेळाडूंच्या मानसिकतेवर म्हणावे तितके संशोधन झाले नाही. खेळाडूंची आर्थिक परिस्थिती, फिटनेस व अन्य घटकांचा विचार करतो मात्र खेळाडूंच्या मानसिकतेचा म्हणावा तितका विचार करीत नाही.

क्रीडा क्षेत्रात करियर करीत असताना मानसिक घटक अतिशय महत्त्वाचा आहे म्हणून खेळाडूंच्या मानसिकतेवर भर दिला पाहिजे असेही ते शेवटी म्हणाले.

प्रारंभी मान्यवरांचे स्वागत प्राचार्य बापूराव पवार यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यशाळेस अग्रणी महाविद्यालय अंतर्गत कस्टलर झोन मधील पाच महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजया पवार यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. आशा सावंत यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारिरीक शिक्षण संचालिका प्रा. अनिता व्हटकर यांनी केले. ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी प्रा. सुरेश डुरेपाटील, प्रा. डॉ. राजेंद्र महानवर, किरण भोंगाळे, सचिन माने, साहेबराव लोखंडे यांनी परिश्रम घेतले.

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
— शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, संचलित

# Arts and Commerce College, Kadepur

# Department of Physical Education & Sports



## Online Webinar – 2020-21



दै. प्रतिसंग्राम.... दि. 9/7/2021

# क्रीडा क्षेत्रात करिअर करण्यासाठी अनेक कौशल्ये आत्मसात करावी लागतात:प्रा.शीला मोहिते

**कडेगांव/प्रतिनिधीः**

क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक घडामोडी घडत असून खेळांविषयीची जागरूकता वाढलेली दिसून येते. पण क्रीडा क्षेत्रात करिअर करण्यासाठी अनेक कौशल्ये आत्मसात करावी लागतात. असे प्रतिपादन कडेगांव येथिल कन्या महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण संचालक प्राध्यापिका श्रीमती शीला मोहिते यांनी केले.

ते आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज कडेपूर येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित ऑनलाईन वेबिनार मध्ये क्रीडा व्यवस्थापनातील करिअरच्या संधी या विषयावर बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदयसिंह मानेपाटील हे होते. प्रारंभी शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौरव पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये वेबिनार आयोजित करण्यामागील हेतू स्पष्ट करून प्रमुख वक्त्यांची ओळख करून दिली.

क्रीडा क्षेत्रामध्ये फक्त एक उत्कृष्ट खेळाडू, उत्कृष्ट प्रशिक्षक व एखादा शिक्षक एवढ्याच मर्यादित करिअरच्या संधी नसून या पलीकडे स्पोर्ट सायकॉलॉजिस्ट, स्पोर्ट्स जर्नालिझम, स्पोर्ट्स फिजिओथेरपिस्ट, स्पोर्ट मॅनेजमेंट, स्पोर्ट अॅडमिनिस्ट्रेटर, जिम इंस्ट्रक्टर व थलीट मॅनेजर यासह अनेक संधी क्रीडा क्षेत्रामध्ये उपलब्ध आहेत, असे सांगून प्राध्यापिका श्रीमती शीला मोहिते पुढे म्हणाल्या कि, जागतिकीकरणामध्ये उद्योग क्षेत्राने क्रीडा क्षेत्रावर लक्ष केंद्रीत केले आहे. प्रीमियर लीगच्या माध्यमातून प्रायोजक पुढे येत आहेत. प्रचंड पैसा लावत आहेत. त्यामुळे क्रीडा क्षेत्रात काम करणाऱ्यांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे, असेही त्या शेवटी म्हणाल्या.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. उदयसिंह मानेपाटील म्हणाले की, क्रीडा क्षेत्राकडे आपण उत्तम करिअर म्हणून पाहिले असता आपणास क्रीडा क्षेत्रामध्ये उत्तम प्रकारचे करिअर करता येते. शिवाय खेळाच्या सानिध्यात राहिल्यास आपले आरोग्य, शरीर आपण उत्तम राहू शकतो. सध्याच्या काळामध्ये शरीर संपत्ती हीच महत्त्वाची असून ती संपत्ती चांगली ठेवायची असेल तर मैदाना शिवाय पर्याय नाही असेही प्राचार्य शेवटी म्हणाले. या ऑनलाईन वेबिनारसाठी महाराष्ट्रातील विविध विद्यापीठातून व महाविद्यालायातून प्राध्यापक-प्राध्यापिका, संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने भाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अभिजित दळवी यांनी तर आभार प्रा.जयदिप दिक्षित यांनी मानले. सदर वेबिनार पार पडण्यासाठी प्रा.डॉ.जयदीप दिक्षित यांनी तांत्रिक साहाय्य केले. हा वेबिनार यशस्वीपणे पार पडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उदयसिंह मानेपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.गुलाब बागवान, प्रा. गौरव पाटील प्रा. अभिजित दळवी यांनी परिश्रम घेतले.

Arts and Commerce College ... Dist. Sangli